**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.२०/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १७ फेब्रुवारी, २०१२.

प्रति,
आयुक्त,
सर्व महानगरपालिका,

विषयः- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१२
नवीन मतदान यंत्रामध्ये मेमरी चीपचा निकाल

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.२०/का-५, दिनांक- २० नोव्हेंबर, २००६ अन्वये मतमोजणीच्यावेळी मतदान यंत्राच्या दर्शक भागामध्ये (डिस्प्ले सेक्शन) बिघाड झाल्यामुळे त्यावर निकाल दिसत नसल्यास निकाल पाहण्याकरिता करावयाची कार्यवाही निश्चित करून दिली आहे. राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये नवीन मतदान यंत्राचा वापर केला असून त्यामध्ये मतदान यंत्रामध्ये काही बिघाड झाल्यास निकाल पाहण्याकरिता खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी :-

१) ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल त्या कंट्रोल युनिटचे कॅन्ड सेट सेक्शन उपस्थित उमेदवार / मतमोजणी प्रतिनिधींच्या सोबतच्या घोषणापत्रावर सह्या घेतल्यानंतर उघडावे.

२) त्यानंतर ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल त्या मतदान यंत्रावरील खोचून लावलेली काढता येणारी मेमरी ओढून काढावी. (यावेळी कंट्रोल युनिटचे मागील ऑन / ऑफ स्वीच बंद असणे आवश्यक आहे.)

३) राखीव मतदान यंत्रामधील एक कंट्रोल युनिट घ्यावे ज्यावर कोणतीही मते नोंदविलेली नसतील. अशा कंट्रोल युनिटमध्ये ही काढता येणारी मेमरी बसविण्यात यावी. (या ठिकाणी कोठेही बॅलट युनिट कंट्रोल युनिटला जोडण्यात येऊ नये.)

४) या राखीव मतदान यंत्रामध्ये बॅटरी बसवावी.

५) मागून ऑन / ऑफ स्वीच ऑन करावा.

६) त्यानंतर memory changed असा मेसेज येईल. त्यानंतर बॅटरीची क्षमता दाखविली जाईल.

७) वरील डिस्प्ले थांबल्यानंतर Result-II हे बटण दाबून धरावे. त्यानंतर काही वेळाने निकाल दिसायला सुरुवात होईल. (निकालाच्या सुरुवातीला काही मतदान यंत्रामध्ये Bank 2 असा मेसेज येईल.)

वरील कार्यपध्दती अवलंबून निकाल पाहण्यात यावा. मात्र, असे करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उपरोक्त आदेशासोबत जोडल्याप्रमाणे घोषणापत्र (Declaration) लिहून त्यावर सर्व उपस्थित उमेदवार / मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सह्या घ्याव्यात.

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट

## घोषणापत्र

------------------------ महानगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूक---------

प्रभाग क्रमांक-----------------------------------------------

मतदान केंद्र क्रमांक ------------------------------------

मूळ कंट्रोल युनिट (निकाल दिसत नसलेल्या) क्रमांक ---------------------------------------

वर नमूद केलेल्या कंट्रोल युनिटमधील निकाल दिसत नसल्यामुळे त्या कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी खालील राखीव कंट्रोल युनिटमध्ये घालून निकाल पाहण्यात येत आहे.

राखीव कंट्रोल युनिट चा क्रमांक ---------------------------------------

राखीव कंट्रोल युनिटमधील बॅटरीचा क्रमांक ------------------------------------

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक-

ठिकाण-

वेळ

उपस्थित उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांचे नांव व सहया

------------------------------------------------------------ ----------------------------------------

------------------------------------------------------------ ----------------------------------------

------------------------------------------------------------ ----------------------------------------

------------------------------------------------------------ ----------------------------------------

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक-२० नोव्हेंबर, २००६.

## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे (सुधारणा) आदेश, २००६

नगरपरिषद/नगरपंचायत व महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे आदेश.

भारताचे संविधान

क्रमांक - रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.२०/का-५, - ज्याअर्थी, भारतीय संविधान संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००४/प्र.क्र.२/का-६ दि १३ एप्रिल २००४ व दि. १६ ऑक्टोबर २००४ अन्वये नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूकांच्याबाबत तसेच क्र. रानिआ/मनपा/२००४/प्र.क्र.१३/का-५ दि. ७ जानेवारी २००५ अन्वये महानगरपालिका निवडणूकांच्याबाबत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की मतमोजणीच्या वेळी काही मतदान यंत्रांच्या दर्शक भागामध्ये (Disply Section) बिघाड झाल्यामुळे त्यावर निकाल दिसत नाही.

आणि ज्याअर्थी, अशा ठिकाणी निकाल पाहण्यासाठी सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश जारी करणे अत्यावश्यक झाले आहे;

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० अे (४), मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १८ अ (४) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक-२) चे कलम ९ (४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) चे कलम १४(४) अन्वये तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

ज्या मतदान यंत्रांवरी मतमोजणीच्या वेळी मतदान यंत्रांच्या दर्शक भागामध्ये (Disply Section) वर निकाल दिसत नसेल त्यावेळी प्रथम मतदान यंत्राची बॅटरी संपली असल्याने राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र १८/का-५ दि.१३.६.२००५ अन्वये मतदान यंत्राची बॅटरी बदलावी व निकाल पहावा. असे केल्यानंतरदेखील निकाल दिसत नसेल तर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी

१. ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल त्या कंट्रोल युनीटचे कॅन्ड सेट सेक्शन उपस्थित उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधींच्या सोबतच्या घोषणापत्रावर सहया घेतल्यानंतर उघडावे.

२. त्यानंतर ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल त्या मतदान यंत्रावरील खोचून लावलेली काढता येणारी मेमरी ओढून काढावी. (यावेळी कंट्रोल युनिटचे मागील ऑन/ऑफ स्वीच बंद असणे आवश्यक आहे.)

३. राखीव मतदान यंत्रांमधील एक कंट्रोल युनीट घ्यावे ज्यावर कोणतीही मते नोंदविलेली नसतील. अशा कंट्रोल युनिटमध्ये ही काढता येणारी मेमरी बसविण्यात यावी. (या ठिकाणी कोठेही बॅलट युनिट कंट्रोल युनिटला जोडण्यात येऊ नये. )

४. या राखीव मतदान यंत्रामध्ये बॅटरी बसवावी.

५. मागून ऑन/ऑफ स्वीच ऑन करावा.

६. त्यानंतर Er असा मेसेज येईल.

७. Result-II हे बटन दाबावे व तसेच दाबून धरावे.

८. सुरुवातीला Er असा मेसेज येईल.

९. त्यानंतर संबंधित np (Candidate Setting) दिसू लागेल.

१०. त्यानंतर Result-II बटन सोडावे.

११. त्यानंतर निकाल दिसणे सुरु होईल.

वरील कार्यपध्दती अवलंबून निकाल पाहण्यात यावा. मात्र, असे करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सोबत जोडल्याप्रमाणे घोषणापत्र (Declaration) लिहून त्यावर सर्व उपस्थित उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सहया घ्याव्यात.

07-6-05

( नन्द लाल )

राज्य निवडणूक आयुक्त,

महाराष्ट्र